# कुंडलिनी : जीवनाचे रहस्य

## बाबा मुक्तानंद यांच्या पुस्तकातून एक उद्धरण

सत्य हे आहे की, हा देह हेच देवाचे मंदिर आहे. या मनुष्यदेहापेक्षा महान असे कोणतेच मंदिर नाही. प्रत्येकाने याचे मननचिंतन करायला हवे आणि आपल्या अंतरी देव वास करतो हे जाणायला हवे. जसे एखादा म्हणतो, “ही माझी मालमत्ता आहे,” किंवा “हे माझे घर आहे,” तसेच माणसाने हे म्हणण्याचा अधिकार प्राप्त करायला हवा, “देव माझ्या अंतरी आहे.” तुकाराम महाराज म्हणतात, “मी देवाला शोधायला गेलो; पण मला देव सापडला नाही. मी स्वतःच देव झालो. ह्याच देहात, देवाने स्वतःला माझ्यासमक्ष प्रकट केले.” आणि हे पूर्णपणे खरे आहे.

हेच ते ज्ञान आहे जे कुंडलिनी सहस्त्रारामध्ये विलीन झाल्यावर उदयास येते. ही पराभक्तीची स्थिती आहे ज्यामध्ये ना भक्त असतो, ना देव, ना जगत, तर असते ते केवळ एकत्व. ज्याप्रमाणे एक नदी, दीर्घकाळ वाहत राहिल्यानंतर समुद्राला जाऊन मिळते आणि समुद्रच होते त्याचप्रमाणे, जेव्हा कुंडलिनी आपले कार्य पूर्ण करून सहस्त्रारामध्ये स्थिरावते, तेव्हा तुम्ही ईश्वरामध्ये पूर्णपणे लीन होता.

तुमच्या साऱ्या अशुद्धी आणि आवरणे नष्ट होतात आणि तुम्ही आत्म्यामध्ये पूर्ण विश्रांती घेता. ज्या पडद्यामुळे तुम्ही द्वैतभावाने पाहत होता तो पडदा गळून पडतो आणि हे जगत म्हणजे कुंडलिनीचा आनंदपूर्ण विलास आहे, ईश्वरीय शक्तीची क्रीडा आहे याचा अनुभव तुम्हाला येतो. तुम्ही ह्या विश्वाला परम आनंदमय प्रकाशाच्या रूपात पाहता, जे तुमच्यापासून भिन्न नाही आणि या बोधामध्ये तुम्ही दृढतेने अवस्थित होता. ही मुक्तीची स्थिती आहे, पूर्णत्वाची स्थिती आहे.

ज्याने ही स्थिती प्राप्त केलेली आहे, त्याला समाधी अवस्थेत जाण्यासाठी डोळे मिटावे लागत नाहीत आणि एखाद्या एकांत स्थळी जावे लागत नाही. तो ध्यान करीत असो, खात असो, स्नान करीत असो, झोपलेला असो, एकटा असो वा इतरांबरोबर असो, तो आत्मशांती आणि आत्मानंदाच्या अनुभवातच राहतो. तो जे काही पाहतो, ते परमेश्वर आहे; तो जे काही ऐकतो, ते परमेश्वर आहे; तो जे काही चाखतो, ते परमेश्वर आहे आणि तो जे शब्द बोलतो, ते परमेश्वराचेच असतात. जगामध्ये राहून, तो गुहेतला एकांत अनुभवतो आणि लोकांमध्ये राहून, तो समाधिसुख अनुभवतो. हीच ती स्थिती आहे जिचे वर्णन शिवसूत्र यामध्ये ‘लोकानन्दः समाधिसुखम्’, असे केलेले आहे अर्थात ‘जगताचा आनंद समाधीचे सुख आहे.’

हेच प्राप्त करण्यासाठी आपण ध्यान केले पाहिजे, आपली कुंडलिनी जागृत करवून घेतली पाहिजे. आपण ईश्वरप्राप्तीसाठी ध्यान करीत नाही, कारण आपल्याला तो आधीच प्राप्त झालेला आहे. आपण ध्यान करतो, जेणेकरून ईश्वर आपल्या अंतरी प्रकट आहे ह्याचा आपल्याला बोध व्हावा. हेच सिद्धयोगाचे ज्ञान आहे, हे फळ आहे त्या अंतर-योगाचे जो सिद्धगुरूंच्या कृपेने कुंडलिनी जागृत झाल्यानंतर क्रियाशील होतो.

आणि यासाठीच मी सर्वांना नेहमी सांगतो, “आपल्या आत्मस्वरूपाचे ध्यान करा, आपल्या आत्मस्वरूपाचा सन्मान करा, आपल्या आत्मस्वरूपाची पूजा करा. तुमचा राम तुमच्या अंतरी तुमच्याच स्वरूपात वास करतो.”

स्वामी मुक्तानंद, कुंडलिनी : जीवनाचे रहस्य
[चित्शक्ती पब्लिकेशन्स, २०१२], पृ. ४४-४६.
डिझाइन प्रारूपरचना : शबनम लाब्रा आणि हीरा टॅनर

© २०२३ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.